**//५//**

**प्रतिवादी क्र.३ तर्फे श्री.व्ही.एम.उप्पे वकिल यांच्यामार्फत उलटतपास सुरु.**

**१५.** मला वादी, प्रतिवादी माहित आहेत. प्रतिवादी क्र.५ हे माझे वडील आहेत. हे खरे की, मला दर्याबाई आणि देवूबाई अशा दोन बहिणी आहेत. हे खरे की, वादी क्र.१ चा मुलगा शिवाजी याचे व दर्याबाईचे लग्न झाले आहे. वादी क्र.१ व २ या माझ्या आत्या आहेत. दि.१२/१२/१९९६ अशी माझी जन्मतारीख आहे. माझे शिक्षण सहीपुरते झाले आहे. मी ४ थी पर्यंत शिकले आहे. मी निर्गम उतारा दाखल करु शकते. दि.०९/०३/२००४ रोजी माझे लग्न झाले. प्रतिवादी क्र.५ यांना गट क्र.११० आणि ११२ मध्ये जमिनी आहेत, याबद्दल मला माहिती नाही. या दोन्ही जमिनी दाव्यात समाविष्ट नाहीत, याबद्दल मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.५ या दाव्यात हजर झालेले नाहीत. हा दावा कशासाठी आहे, हे मला माहिती आहे. हे खरे नाही की, माझया लग्नाच्या वेळी प्रतिवादी क्र.३ ते ७ हे वेगवेगळे राहत होते. मला दावा मिळकतीचे नंबर सांगता येतात. आजोबांना होकर्णा येथे ४० एकर ४० गुंठे जमीन आहे आणि उंबरदरा येथे १२ एकर १६ गुंठे जमीन आहे. उंबरदरा येथे गट क्र.११४ आणि १४३ अशा जमिनी आहेत. होकर्णा येथे गट क्र.१२६ आणि १२७ आहेत. मला दावा जमिनीच्या चतु:सीमा सांगता येतात. गट क्र.१२६ च्या पुर्वेला-प्रल्हाद बामणे यांची जमीन, पश्चिमेला- ज्ञानोबा काळे यांची जमीन, दक्षिणेला- अनंतराव बोळेगावे यांची जमीन आणि उत्तरेला-रस्ता आहे. हे खरे नाही की, दावा मिळकती कोणाकडून कशा आल्या याचा उल्लेख शपथपत्रात नाही. दि.१६/०६/२०२५ रोजी मी माहेरी होते. माझे चुलते गुणाजी घुगे, सदाशिव घुगे, विठ्ठल घुगे आणि वैजन्नाथ घुगे यांनी दि.१४/०६/२०२५ रोजी माझे वडील सिताराम घुगे, भाऊ नागेश घुगे आणि आई सुबीद्रा यांना शेतावर मारहाण केली. मी मारहाण सोडवायला गेले त्यावेळी त्यांनी मला ही मारहाण केली. त्याबद्दलचे कारण मी माझ्या वकिलांना सांगितले होते. याबद्दल माझ्या वकिलांनी अर्ज का दिला नाही याचे कारण मला सांगता येत नाही. दि.२७/०६/२०२५ रोजी मी घरी होते. त्यादिवशी बरे नसल्याने मी कोर्टात आले नाही.

**१६.** दावा मिळकतीचे ७/१२ उतारे मी बघितले आहेत. हे खरे की,

७/१२ उतारे त्यात नमूद फेरफारच्या आधारे तयार झाले आहेत. फेरफार क्र.२७६ मी वाचलेला नाही. मी कुठलेच फेरफार वाचलेले नाहीत. सदर फेरफार क्र.२७६, ५०८, १०५६ यांचा उल्लेख शपथपत्रात मी वादींच्या सांगण्यावरुन केला, हे खरे नाही. मला फेरफार कसे झाले हे माहिती आहे, म्हणून मी त्याचा उल्लेख केला आहे. या फेरफारांना वादीने आक्षेप घेतला किंवा कसे हे मला माहित नाही. सदर फेरफार कधी, का मंजूर झाले हे मला माहित नाही. हे खरे की, त्यातील मजकुर मला माहिती नाही.

**१७.** माझे आजोबा रामराव यांचे वय १०० वर्षांच्या पुढे आहे. आजोबा खडखडीत आहेत. २००३ साली माझी आज्री पांडयाबाई मयत झाली. माझे आजोबा त्यांचा थोरला मुलगा गुणाजी यांच्याकडे राहतात. प्रतिवादी क्र.४ ते ७ यांचे राशन कार्ड वेगवेगळे आहेत, हे खरे आहे. हे खरे की, ते आपआपल्या पत्नीसह आणि मुलांसह वेगवेगळे राहतात. हे खरे की, त्यांचे खाणे-पिणे वेगवेगळे आहे. हे खरे की, प्रत्येकजण आपआपले सण-समारंभ आपआपल्या पध्दतीने साजरे करतात. प्रतिवादी क्र.४ ते ७ यांनी आपआपल्या हिश्शांवर कर्ज काढून ते फेडले याची मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.३ चे पालन-पोषण सर्व प्रतिवादी आळीपाळीने करतात हे खरे नाही. मी सांगते की, ते प्रतिवादी क्र.४ कडेच राहतात.

**१८.** होकर्णा येथील गट क्र.१२६ मधील १ हेक्टर ६० आर जमीन वडिलोपार्जित असल्याबद्दल मी पुरावा देवू शकते. उंबरदरा येथील गट क्र.११४ मधील ० हेक्टर ६० आर जमीन वडिलोपार्जित असल्याबद्दल मी पुरावा देवू शकते. खरेदीपत्र क्र.४१०/२१ मी पाहिलेले नाही. खरेदीपत्र क्र.२०९/२००८ मी पाहिलेले नाही. त्यातील खरेदी देणार-घेणार कोण आहेत, ते मला माहित नाही. ते खरेदीपत्र कशासाठी झाले हे मला माहिती नाही. त्यातील मजकुराची मला माहिती नाही. त्या खरेदीपत्रावर मी साक्षीदार नाही. हे खरे की, सन २००८ व २०२१ साली मी सासरी होते. या खरेदीपत्राच्या अनुषंगाने झालेले फेरफार कोणाच्या नावे झाले हे मला सांगता येत नाही. माझ्या परिच्छेद क्र.६ मधील मजकुर मी का

लिहिला याचे कारण मला देता येणार नाही. फेरफार क्र.७९९ मला माहित नाही. हे खरे नाही की, ७/१२ सदरी ज्याचे नाव होते त्याच्या नावे संपादन झाले.

**१९.** फेरफार क्र.५०९ हा खरेदीपत्र डे बुक क्र.२०९/२००८ च्या अंमलाने झाला याबद्दल मला माहिती नाही. फेरफार क्र.१०५६ हा खरेदीपत्र डे बुक क्र.४१०/२०२१ च्या अंमलाने झाला याबद्दल मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.५ ने कैफीयत दिलेली नाही.

**२०.** प्रतिवादी क्र.५ च्या नावची जमीन ३६ गुंठे होकर्णा तलावासाठी संपादीत झाली, हे खरे आहे. हे खरे की, गंगाबाईच्या नावची १ हेक्टर ५ आर जमीन होकर्णा तलावासाठी संपादीत झाली. हे खरे की, कागदपत्रांची पडताळणी होवून ती जमीन संपादीत झाली. मला संपादनाच्या प्रक्रियेबद्दल माहिती नाही. सदर परिच्छेद क्र.७ मध्ये माझ्या वडिलांची जमीन गेल्याने मला माहिती असल्याने तो मजकूर लिहिला. वाढीव मावेजा मिळण्यासाठी न्यायालयात अर्ज केला आहे. त्या न्यायालयात वादीने उजर घेतलेला नाही. दि.२५/१०/२०२१ रोजी मी माझ्या माहेरी होते. हे खरे नाही की, १९८६ साली झालेल्या वाटणीप्रमाणे फेरफार क्र.२७६ झाला. १९८६ साली माझे वय काय होते हे मला आठवत नाही. गुणाजी हे सर्व भावडांमध्ये मोठे आहेत. हे खरे की, वादी आपआपल्या सासरी सुखी आहेत. हे खरे की, त्यांच्या मुलांचे ही लग्न झालेले आहेत. वादींच्या मुलांच्या लग्नांना आम्ही कोणीही गेलो नव्हतो. दावा परिच्छेद क्र.१ मधील मजकुराची मला माहिती नाही. शपथपत्र परिच्छेद क्र.१ मधील मजकुर मला माहिती आहे. २०२१ सालापासून दाव्याला कारण घडले. आजोबांनी किशाबाईला जमीन करुन दिली, त्यामुळे दाव्याला कारण घडले.

**<u>मध्यान्हाची वेळ झाल्यामुळे उलटतपास तहकुब करण्यात आला.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**

**दिनांक २३/०७/२०२५.** दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.

**//८//**

**प्रतिवादी क्र.३ तर्फे श्री.व्ही.एम.उप्पे वकिल यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरु.**

**२१.** प्रतिवादींनी मिळकत हस्तातंरीत करु नये म्हणून महसुल दप्तरी आम्ही अर्ज दिलेले नाहीत. वादीने वाटपाची विनंती केली, त्यावेळेला मी हजर होते. जिवे मारण्याची धमकी दिल्यानंतर प्रतिवादींविरुध्द आम्ही पोलीस ठाण्यात अर्ज केलेला नाही. माझ्यासमोरच दि.२५/१०/२०२१ रोजी वादीने वाटणी मागितली. माझ्या सांगण्याप्रमाणे दिवाळीच्या सणाला मी माहेरी होते. सरतपास परिच्छेद क्र.१३ आणि १४ मधील मजकुर मला माहिती नाही. प्रतिवादींनी मावेजा उचलू नये म्हणून आम्ही हरकत उभारली नाही. प्रतिवादींची घरे दावा मिळकत म्हणून सामील केलेली नाहीत. गट क्र.११० व १११ मध्ये माझ्या वडिलांच्या नावे जमीन आहे की नाही हे मला माहिती नाही. आता मला नि.क्र.८२ आणि ८३ हे उतारे दाखवले. त्यात माझ्या वडिलांच्या नावे अनुक्रमे गट क्र.११० मध्ये ७५ आर आणि गट क्र.१११ मध्ये ७१ आर एवढे क्षेत्र नमूद आहे. हे खरे की, या मिळकती दाव्यात नमूद नाही. या ११० आणि १११ या मिळकती माझ्या वडिलांकडे कोठून आल्या हे मला माहिती नाही. हे खरे की, मी सासरी सुखी आहे. हे खरे की, माहेरी आल्यानंतर माझ्या वडिलांकडे जाते. चुलत्यांकडे जात नाही. हे खरे नाही की, वादी व प्रतिवादी क्र.५ यांच्या सांगण्यावरुन मी शपथपत्र दिले. हे खरे नाही की, शपथपत्रातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे नाही. हे खरे नाही की, वादी क्र.१ च्या मुलाला माझी बहिणी दिली असल्याने वादी क्र.१ ला मिळणारा हिस्सा प्रर्यायाने माझ्या बहिणीला मिळणार असल्याने सदर खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, कागदपत्रांची कोणतीही माहिती नसताना निव्वळ वादीला मदत व्हावी म्हणून मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष
**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.

**दिनांक २३/०७/२०२५.**